# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११००४.

**विषय** : उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रुवारी-मार्च २०१८ लेखी परीक्षा वेळापत्रकाबाबत...

## प्र क ट न

---

फेब्रुवारी-मार्च २०१८ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक मंडळाच्या अधिकृत www.mahahsscboard.maharashtra.gov.in संकेतस्थळावर दिनांक १८/०९/२०१७ पासून उपलब्ध करून देण्यात आले होते. सदर वेळापत्रकाबाबत सुचना, हरकती मंडळाकडे १५ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात मागविण्यात आलेल्या होत्या.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षाचे संभाव्य वेळापत्रकाबाबत लोकप्रतिनिधी, संघटना, पालक, शिक्षक, विद्यार्थी यांचेकडून प्राप्त झालेल्या तक्रारी, सूचना, अभिप्राय यांचे अवलोकन करून **इ.१२वीच्या वेळापत्रकात कोणताही बदल केलेला नाही मात्र इ.१०वीच्या वेळापत्रकात दिनांक ०५/०३/२०१८ रोजीचा द्वितीय सत्रातील नवीन व्यवसाय विषयांची परीक्षा दिनांक १७/०३/२०१८ रोजी प्रथम सत्रात असा बदल करण्यात आलेला आहे.** सुधारित अंतिम वेळापत्रकानुसार लेखी परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | तपशील | लेखी परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| १) | **उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (सर्वसाधारण व द्विलक्षी विषय) व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (पुनर्रचित व जुना अभ्यासक्रम)** | **बुधवार दि.२१ फेब्रुवारी २०१८ ते मंगळवार २० मार्च २०१८** |
| २) | **माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा** | **गुरुवार दि.०१ मार्च २०१८ ते शनिवार २४ मार्च २०१८** |

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेले दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या अधिकृत www.mahahsscboard.maharashtra.gov.in संकेतस्थळावर दिनांक २८/११/२०१७ पासून उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे.** परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे छापील स्वरुपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरून परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सअॅप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये.

प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी, तोंडी परीक्षा व अन्य विषयांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे परीक्षेपूर्वी मंडळामार्फत शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांना कळविण्यात येईल.

**परीक्षा सुरु झाल्यानंतर कोणत्याही परीक्षार्थ्यास परीक्षागृहात प्रवेश दिला जाणार नाही तसेच परीक्षा संपेपर्यंत कोणत्याही परीक्षार्थ्यास परीक्षागृहाबाहेर जाता येणार नाही.**

सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(कृष्णकुमार पाटील)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे-४